# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ०८/०३/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२७५** | **विषय क्रमांक – २७५**
**दिनांक- ८/०३/२०२३** | **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२७५**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वैद्य/९/कावि/४०९३/२०२२ दि.२७/१२/२०२२ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११०३ दि.१०/०१/२०२३ अन्वये, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर माता व बालके यांना मोफत सेवा देणेबाबत. |
| **ठराव क्र. २७५**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वैद्य/९/कावि/४०९३/२०२२ दि.२७/१२/२०२२ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११०३ दि.१०/०१/२०२३ अन्वये, मा.सहसचिव, नगरविकास विभाग,मंत्रालय महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.बैठक/२०११/प्र.क्र.२२२/ नवि-२० दि.७/१/२०१२ चे पत्रान्वये गरोदर मातांना व नवजात अर्भकांना सार्वजनिक रुग्णालयांमध्ये संपुर्ण सेवा मोफत पुरविणेबाबत मा.केंद्रीय आरोग्य मंत्री, भारत सरकार यांना मा.मुख्यमंत्री यांनी कळविले होते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका यांचे मार्फत चालविल्या जाणा-या आरोग्य संस्था यांनी गरोदर मातांना व ०-३० दिवस वयाच्या नवजात अर्भकांना मोफत आरोग्य सेवा देणे बाबत कळविले होते. शासनाकडील दि.७/१/२०१२ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम अंमलबजावणी करणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२७८ दि.२५/९/२०१२ व मा.महापालिका सभा ठराव क्र.१३९ दि.२६/११/२०१२ अन्वये खालील बाबींसाठी मोफत वैद्यकिय उपचार व सेवा देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.<br>**<u>गरोदर मातांसाठी-</u>**<br>१. मोफत बाळंतपण २. मोफत सिझेरियन ३. मोफत औषधोपचार ४.मोफत तपासणी(पॅथॉलॉजी) ५.मोफत रक्त (म.न.पा.चे रक्तपेढीमधून) ६. सवलत(user charges)<br>**<u>नवजात अर्भकासाठी-</u>**<br>१.मोफत औषधोपचार २. मोफत तपासणी ३.मोफत रक्त (म.न.पा.चे रक्तपेढीमधून) ४.सवलत(user charges) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत वरील प्रमाणे औषधोपचार व सेवा मनपाच्या रुग्णालय/दवाखाना मार्फत दि.२१/९/२०१२ पासून देण्यात येत आहे.<br>मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे यांचेकडील पत्र क्र.राकुकका/जशिशुका/अंमलबजावणी/कक्ष १० ब/JSSK/न.क्र.५४४/३३६८६-८१७/१६ दि.२/६/२०१६ अन्वये जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदरपणात व प्रसुतीनंतर ४२ दिवसांपर्यंत मातेस व १ वर्षापर्यंतच्या आजारी बालकास आरोग्य सेवा पुढील प्रमाणे देणे आवश्यक आहे असे कळविले आहे.<br>१) प्रसुती तसेच सिझेरियन शस्त्रक्रिया<br>२) आवश्यक औषधे व इतर साहित्ये<br>३) प्रयोगशाळेतील आवश्यक त्या तपासण्या<br>४) संस्थात्मक प्रसुती पश्चात मातेला मोफत आहार (नॉर्मल प्रसुतीस ३ दिवस तर सिझेरियन प्रसुत मातेस ७ दिवस)<br>५) गरजेनुसार रक्त पुरवठा<br>६) संदर्भ सेवा (घरापासून दवाखान्यात, एका आरोग्य संस्थेतून दुस-या आरोग्य संस्थेत |

| | |
|---|---|
| | पोहचविण्यासाठी, प्रसुती पश्चात आरोग्य संस्थेतुन घरी पोहचविण्यासाठी वाहन व्यवस्था)<br>उपरोक्त सेवा महापालिकेच्या रुग्णालय/दवाखान्यांमध्ये मोफत दिल्यास जास्तीत जास्त मातांना व बालकांना सदर सेवांचा लाभ मिळू शकेल आणि माता मृत्यु व बालक मृत्यु कमी होण्यास मदत होईल. यासाठी शासनाने कळविल्यानुसार वरीलप्रमाणे जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदरपणात व प्रसुतीनंतर ४२ दिवसांपर्यंत मातेस व १ वर्षापर्यंतच्या आजारी बालकास आरोग्य सेवा देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२७६** **विषय क्रमांक – २७६**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२७६**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.अति.आयुक्त(२) पशुवैद्यकीय यांचे कडील पत्र क्र.पवै/०२/कावि/३४३/२०२२ दि.२९/१२/२०२२ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १११५ दि.१०/०१/२०२३ अन्वये, सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकात व सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रका मध्ये नविन लेखाशिर्षास मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. २७६**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.अति.आयुक्त(२) पशुवैद्यकीय यांचे कडील पत्र क्र.पवै/०२/कावि/३४३/२०२२ दि.२९/१२/२०२२ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १११५ दि.१०/०१/२०२३ अन्वये, मनपाचे पशुवैद्यकीय विभागामार्फत प्राणी सुश्रुषा केंद्र व छोटे पाळीव प्राण्यांकरीता दवाखाने स्थापित करण्यात आलेले आहेत. तसेच येत्या काही कालावधीत क्षेत्रिय कार्यालय निहाय दवाखाने स्थापित करणे प्रस्तावित असुन त्याकरीता मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. याकामी बाह्यस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पदांची नावे, कर्मचारी संख्या व त्याकरीता येणारा खर्चाचा तपशिल पुढील तक्त्याप्रमाणे. |

| अ.क्र | पद | संख्या | प्रति माह येणारा खर्च | दोन वर्षाकरीता येणारा खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | पशुशल्यचिकित्सक | १ | ६७५२२ | १६२०५२८ |
| २ | पशुवैद्यकीय अधिकारी | ८ | ४९८६२५ | ११९६७००० |
| ३ | पशुवैद्यक | १ | ६२३२८ | १४९५८७२ |
| ४ | क्युरेटर | १ | ६२३२८ | १४९५८७२ |
| ५ | आरोग्य निरीक्षक | २ | ५६४०७ | १३५३७६८ |
| ६ | लाईव्ह स्टॉक सुपरवायझर | ८ | २२५६२८ | ५४१५०७२ |
| ७ | ऍनिमल किपर | ४ | ११२८१४ | २७०७५३६ |
| ८ | डॉग पिग स्कॉड कुली | १० | २५१०१५ | ६०२४३६० |
| ९ | कॅटल स्कॉड कुली | १० | २५१०१५ | ६०२४३६० |
| १० | एक्स रे / सोनोग्राफी ऑपरेटर | १ | २८२०४ | ६७६८९६ |
| ११ | फार्मासिस्ट | १ | २८२०४ | ६७६८९६ |
| १२ | ऍनिमल केअर टेकर | ४ | १००४०६ | २४०९७४४ |
| १३ | सफाई कामगार | १० | २५१०१५ | ६०२४३६० |
| | **एकुण** | **६१** | **१९,८५,५११** | **४,७८,९२,२६४** |

उक्त केलेप्रमाणे बाह्यस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा प्रसिध्द करणेकामी प्रस्तावित केली असुन सन २०२२-२३ मुळ सुधारीत अंदाजपत्रकात र.रु.२,००,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी फक्त) इतक्या रकमेची आवश्यकता आहे. तसेच सन २०२३-२०२४ च्या मुळ अंदाजपत्रकात र.रु.५,००,००,०००/- (अक्षरी र.रु. पाच कोटी फक्त) इतक्या रकमेची आवश्यकता आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भटक्या श्वानांचे रेबिज प्रतिबंध लसीकरण करुन व रेबिज मुक्त शहर करणे व श्वानांचे आरोग्य अबादीत राखणेकरीता लागणारे रेबिज प्रतिबंध लस व याकामी लागणारे साहित्य-रसायने खरेदी कामी सन २०२२-२३ मुळ सुधारीत अंदाजपत्रकात र.रु.२,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) व सन २०२३-२०२४ च्या मुळ अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) इतक्या रकमेची आवश्यकता आहे. याकरीता सन २०२२-२०२३ चे पशुवैद्यकीय विभागाचे सुधारीत अंदाजपत्रकामध्ये बाह्यस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ पुरविणे व रेबिज निर्मुलन कामकाज हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करणे प्रस्तावित आहे. तरी सन २०२२-२०२३ च्या सुधारित अंदाजपत्रकात व सन २०२३-२०२४ चे पशुवैद्यकीय विभागाचे अंदाजपत्रकात बाह्यस्त्रोत पध्दतीने मनुष्यबळ पुरविणे व रेबिज निर्मुलन कामकाज

| | |
|---|---|
| | हे लेखाशिर्षक निर्माण करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२७७** **विषय क्रमांक – २७७**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२७७**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रिडा/७/कावि/१०/२०२३ दि.०५/०१/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११४१ दि.१०/०१/२०२३ अन्वये, मनपाचे केशवनगर चिंचवड जलतरण तलावा समोरील मैदान येथे पिंपरी चिंचवड धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसीत करून १० वर्षे कराराने चालविण्यास देणेबाबत. |
| **ठराव क्र. २७७**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रिडा/७/कावि/१०/२०२३ दि.०५/०१/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११४१ दि.१०/०१/२०२३ अन्वये, म.न.पा.चे केशवनगर चिंचवड जलतरण तलावा समोरील मैदान येथे नव्यानेआर्चरी केंद्र उभारणेत आलेले असून प्रथमच मनपाच्या वतीने आर्चरी केंद्र सुरू करत आहोत सदर आर्चरी प्रशिक्षण केंद्र म.न.पा.च्या वतीने सुरू करणेकामी अंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक असणे आवश्यक आहे. म.न.पा.चे केशवनगर चिंचवड जलतरण तलावा समोरील मैदान येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी एखाद्या खाजगी संस्थेस सदर आर्चरी प्रशिक्षण केंद्र, हे कराराने चालविण्यास देणे योग्य होईल. आर्चरी प्रशिक्षण केंद्र हे एखाद्या नामांकित प्रशिक्षकास, संस्थेस चालविण्यास दिल्यास म.न.पा. परिसरात अनेक आर्चरी खेळाडू तयार होण्यास मदत होईल. श्रीम.सोनल बुंदुले, सचिव, पिंपरी चिंचवडआर्चरी असोसिएशन, कुणाल प्लाझा, सी २०, रेल्वे स्टेशन जवळ चिंचवड, पुणे – १९ यांनी पत्रान्वये धनुर्विद्या हा खेळ जागतिक दर्जा वर खेळला जात असून भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अग्रणीय यादीत महाराष्ट्रात हा खेळ प्रसिध्द असून पिंपरी चिंचवड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलित होत आहे.परंतु सदर खेळाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाची मैदाने व सोयी सुविधा उपलब्ध नाहीत. महानगरपालिकेने धनुर्विद्या खेळाचा सकारात्मक विचार करून धनुर्विद्या खेळाचे मैदान केशवनगर चिंचवड, हे विकसित करून पिंपरी चिंचवड संघटनेस भाडेतत्वावर चालविण्यास दिल्यास शहरातील वेगवेगळया भागातील खेळाडूंना हा खेळ खेळता येईल. याच मैदानावर जवळील महानगरपालिकेतील शाळेचे विद्यार्थी देखील सराव करू शकतील. तरी वरील मैदाने लवकरात लवकर विकसित करून मिळावी अशी पत्राने मागणी केलेली आहे. श्रीम. सोनल बुंदुले, यांनी आर्चरी या खेळात प्राविण्य मिळविले आहे. श्रीम.सोनल बुंदुले, सचिव, यांनी पिंपरी चिंचवडआर्चरी असोसिएशन चिंचवड, पुणे – १९ या संस्थे मार्फत जागतिक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरीय, विद्यापीठ स्तरीय खेळाडू घडविलेले आहेत. श्रीम.सोनल बुंदुले, सचिव, यांनी पिंपरी चिंचवड आर्चरी असोसिएशन चिंचवड, पुणे – १९ या संस्थे मार्फत घडविलेल्या जागतिक, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरीय, विद्यापीठ स्तरीय खेळाडूंची माहिती त्यांनी त्यांचे पत्रासोबत जोडलेली असून मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार, म.न.पा.चे केशवनगर चिंचवड जलतरण तलावा समोरील मैदान पिंपरी चिंचवडआर्चरी असोसिएशन चिंचवड, पुणे – १९ यांनी आर्चरी प्रशिक्षण केंद्र सुरू करणे करिता कराराने चालविण्यास देणेकामी कळविले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात राज्य, राष्ट्रीय आंतर राष्ट्रीय स्तरावर आर्चरी खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने श्रीम.सोनल बुंदुले, सचिव, यांनी पिंपरी चिंचवडआर्चरी असोसिएशन चिंचवड, पुणे-१९ यांना म.न.पा.चे केशवनगर चिंचवड येथील मैदान पिंपरी चिंचवड |

| | |
|---|---|
| | धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसीत करून १० वर्षे कराराने चालविण्यास देणे आवश्यक आहे. सबब म.न.पा.चे केशवनगर चिंचवड येथील श्रीम.सोनल बुंदुले, सचिव, यांनी पिंपरी चिंचवड आर्चरी असोसिएशन चिंचवड, पुणे-१९ यांना क्रीडा विभागाकडील अटी शर्ती नुसार पिंपरी चिंचवड धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसीत करून १० वर्षे कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२७८** **विषय क्रमांक – २७८**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२७८**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रिडा/६/कावि/०९/२०२३ दि.०५/०१/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११४२ दि.१०/०१/२०२३ अन्वये, म.न.पा.चे सेक्टर क्र.१०, हॉकी मैदान, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, येथील खेळाचे मैदान पिंपरी चिंचवड धनुर्विद्या(आर्चरी) प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसीत करून १० वर्षे कराराने चालविण्यास देणेबाबत. |
| **ठराव क्र. २७८**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रिडा/६/कावि/०९/२०२३ दि.०५/०१/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११४२ दि.१०/०१/२०२३ अन्वये, म.न.पा.चे सेक्टर क्र. १०, हॉकी मैदान, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, येथील खेळाचे मैदान,येथे नव्यानेआर्चरी केंद्र उभारणेत आलेले असून प्रथमच मनपाच्या वतीने आर्चरी केंद्र सुरू करत आहोत सदर आर्चरी प्रशिक्षण केंद्र म.न.पा.च्या वतीने सुरू करणेकामी अंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक असणे आवश्यक आहे. म.न.पा.चे सेक्टर क्र.१०, हॉकी मैदान, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, येथील खेळाचे मैदान, येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी एखाद्या खाजगी संस्थेस सदर आर्चरी प्रशिक्षण केंद्र, हे कराराने चालविण्यास देणे योग्य होईल. आर्चरी प्रशिक्षण केंद्र हे एखाद्या नामांकित प्रशिक्षकास, संस्थेस चालविण्यास दिल्यास म.न.पा.परिसरात अनेक आर्चरी खेळाडू तयार होण्यास मदत होईल. श्री.प्रशांत शिंदे, सचिव, द्रोणाआर्चरी, फ्लॅट नं ए १९, ६ वा मजला, ए विंग, साई शिव कॉर्नर, नेहरूनगर, पिंपरी १८ यांचे दि.११/०५/२०२२ चे पत्रान्वये I have started drone archery academy at 2017 in Pune till the date we international medalist players, national medalist and many state medal holders. from last year we are facing a ground issue for the practice. we do not have proper archery ground sir if given an opportunity we assure you that we will do our best to promote archery in Pimpri chinchwad we are sure that we will improve more and produce archery players and their best results will make proud off अशी पत्राने मागणी केलेली आहे. श्री.प्रशांत रामदास शिंदे, यांनी आर्चरी या खेळात प्राविण्य मिळविलेले आहे.<br>**प्रशिक्षक म्हणून केलेली कामगिरी-**<br>1. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा प्रशिक्षक म्हणून काम केले - 2021<br>2. दुसरी खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा 2021 ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वर्ष 2022 झाली प्रशिक्षक म्हणून काम केले.<br>3. मध्य प्रदेश भोपाळ येथे झालेल्या राष्ट्रीय कुमार गट स्पर्धा मध्ये 2019 महाराष्ट्र राज्याचा प्रशिक्षक म्हणून काम केले.<br>4. जमशेदपूर येथे झालेल्या वरिष्ठ गट राष्ट्रीय धनुर्विद्या अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याचा संघ समन्वयक म्हणून काम केले.<br>5. उडीसा येथील कटक येथे झालेल्या वरिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याचा प्रशिक्षक म्हणून कार्य केले.<br>6. डॉक्टर डी वाय पाटील दंत महाविद्यालय येथे 19 जून 2017 पासून आज पर्यंत क्रीडा मार्गदर्शक म्हणून काम करत असून धनुर्विद्या प्रशिक्षण देत आहे. |

| | |
|---|---|
| | 7. विबगिअर इंटरनॅशनल स्कूल येथे एप्रिल 2014 ते जून 2016 मध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून काम केले आहे तसेच धनुर्विद्याचे प्रशिक्षण दिले आहे.<br>श्री.प्रशांत रामदास शिंदे, यांनी द्रोणा आर्चरी, नेहरूनगर, पिंपरी १८ येथे जागतिक, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरीय, विद्यापीठ स्तरीय खेळाडू घडविलेले आहेत. श्री.प्रशांत रामदास शिंदे, सचिव, द्रोणा आर्चरी, फ्लॅट नं ए १९, ६ वा मजला, ए विंग, साई शिव कॉर्नर, नेहरूनगर, पिंपरी १८ यांनी घडविलेल्या जागतिक, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरीय, विद्यापीठ स्तरीय खेळाडूंची माहिती त्यांनी त्यांचे पत्रासोबत जोडलेली असून मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार, म.न.पा.चे सेक्टर क्र.१०, हॉकी मैदान, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, येथील खेळाचे मैदान, हे श्री.प्रशांत रामदास शिंदे, द्रोणा आर्चरी, फ्लॅट नं ए १९, ६ वा मजला, ए विंग, साई शिव कॉर्नर, नेहरूनगर, पिंपरी १८ यांनी आर्चरी प्रशिक्षण केंद्र सुरू करणे करिता कराराने चालविण्यास देणेकामी कळविले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात राज्य, राष्ट्रीय आंतर राष्ट्रीय स्तरावर आर्चरी खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने श्री.प्रशांत रामदास शिंदे, सचिव, द्रोणा आर्चरी, फ्लॅट नं ए १९, ६ वा मजला, ए विंग, साई शिव कॉर्नर, नेहरूनगर, पिंपरी १८ यांना म.न.पा.चे सेक्टर क्र.१०, हॉकी मैदान, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, हे मैदान पिंपरी चिंचवड धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसीत करून १० वर्षे कराराने चालविण्यास देणे आवश्यक आहे. सबब म.न.पा.चे सेक्टर क्र.१०, हॉकी मैदान, स्पाईन रोड, मोशी प्राधिकरण, हे श्री.प्रशांत रामदास शिंदे, सचिव, द्रोणाआर्चरी, फ्लॅट नं ए १९, ६ वा मजला, ए विंग, साई शिव कॉर्नर, नेहरूनगर, पिंपरी १८ यांना क्रीडा विभागाकडील अटी शर्ती नुसार पिंपरी चिंचवड धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र म्हणून विकसीत करून १० वर्षे कराराने चालविण्यास देणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२७९** **विषय क्रमांक – २७९**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२७९**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.दू.सं./३/कावि/०४/२०२३ दि.१०/०१/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११६९ दि.१०/०१/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये प्राथमिक शाळेतील इमारतीमध्ये प्राथमिक शिक्षण विभागाने बसविलेल्या सी.सी.टि.व्ही. यंत्रणेचे देखभाल दूरूस्ती करणेस मान्यता घेणेबाबत. |
| **ठराव क्र. २७९**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.दू.सं./३/कावि/०४/२०२३ दि.१०/०१/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक ११६९ दि.१०/०१/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपाचे प्राथमिक शिक्षण विभागाने त्यांचेकडील निविदा नोटीस क्र. ८/२०१६-१७ प्रसिध्द करून लघुत्तम निविदाधारक मे. भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्यादित, पुणे यांस आदेश क्र.शि.मं./९/कावि/९७/२०१७ दिनांक १६/०३/२०१७ अन्वये कामाचा आदेश दिलेला आहे. सदर कामामध्ये ८८ प्राथमिक शाळांमध्ये CCTV यंत्रणा उभारणे व पुरवठा केलेनंतर ४ वर्षे देखभाल दूरूस्तीचा अंतर्भाव निविदा रकमेच्या ५%वार्षिक रक्कम तिमाही पध्दतीने अदा करणेचा अंतर्भाव आहे. सदर एजन्सीचा देखभाल दूरूस्तीचा कालावधी दि.०९/०८/२२ रोजी संपला असून सीसीटिव्ही यंत्रणा उभारणे व देखभाल दूरूस्ती करणेसाठी मनपाकडे अणूविद्युत व दूरसंचार विभाग हा स्वतंत्र तांत्रिक विभाग असलेने यापुढील कामकाज सदर विभागामार्फत करणे आवश्यक आहे. सदर विभागाने सर्व यंत्रणेची तांत्रिक तपासणी केली असून मे.भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्यादित, पुणे यांनी सर्व ठिकाणचे UPS नविन देत असलेबाबत लेखी कळविले आहे. त्यामुळे सदर एजन्सीने नविन UPS पुरवठा केलेनंतरच त्यांचे दि.११/०१/२०२२ ते दि.०९/०८/२०२२ अखेरचे अंतिम बिल अणूविद्युत व दूरसंचार विभागामार्फत अदा करणे आवश्यक आहे. (इमारत बांधकामामुळे काढून ठेवलेले शाळांचे बिल वगळून) त्यामुळे दि.०९/०८/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ अखेर किंवा सदर कामाची नविन निविदा अंतिम होईपर्यत याच एजन्सीला मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच प्राथमिक शिक्षण विभागाकडील सन २०२२-२३ महसुली अंदाजपत्रक पानांक १४५ वरील “सीसीटिव्ही कॅमरे” या लेखाशिर्षावरील र.रू.५० लक्ष तरतूद अणुविद्युत व दूरसंचार विभागाकडील महसुली अंदाजपत्रकावर खालीलप्रमाणे वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| बजेट कोड | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २२-२३ ची तरतूद | वाढ | घट | सन २२-२३ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४१० ७०-०६ | सीसीटिव्ही कॅमरे | प्राथमिक शिक्षण विभाग | ५०,००,००० | ५०,००,००० | ० | ५०,००,००० | ० |
| | प्राथमिक शाळां मध्ये उभारणेत आलेल्या CCTV यंत्रणेची वार्षिक तत्वावर देखभाल दूरूस्ती करणे | अणुविद्युत व दूरसंचार विभाग – देखभाल दूरूस्ती | ५०,००,००० | ० | ३०,००,००० | ० | ३०,००,००० |
| | प्राथमिक शाळां मध्ये उभारणेत आलेल्या CCTV यंत्रणेकरिता Battery पुरविणे व | अणुविद्युत व दूरसंचार विभाग – देखभाल दूरूस्ती | २०,००,००० | ० | २०,००,००० | ० | २०,००,००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जोडणी करणे. | | | | | | |
| | | | | | ५०,००,००० | ५०,००,००० | ५०,००,००० | ५०,००,००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -२८०** **विषय क्रमांक – २८०**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८०**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.विमुका/०५/कावि/६१/२०२३ दि.१३/०२/२०२३अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नव्याने उभारलेले तारांगण पिंपरी चिंचवड सायन्स पार्कला चालविणेस मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. २८०**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. क्र.विमुका/०५/कावि/६१/२०२३ दि.१३/०२/२०२३ अन्वये, " पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सायन्स पार्कजवळ तारांगण हा प्रकल्प उभारला आहे. सदर प्रकल्पात शाळकरी मुलांसाठी तारामंडळ, ग्रह, तारे यांची माहिती मिळणेसाठी व्हीडीओ-ऑडीओ फिल्म दाखविण्यात येणार असुन त्याचा कालावधी ३० मिनिटांपर्यंत आहे.<br><br>सदरचा प्रकल्प पूर्ण झाला असून कार्यान्वीत करणे बाकी आहे. सदरचा प्रकल्प हा सायन्स (शास्त्र) शी संबंधीत असलेने सदरचा तारांगण प्रकल्प हा पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांना चालविणेस देणेबाबत चर्चा करणेसाठी दि.०२/१२/२०२२ रोजी मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सोबत टि-४ नुसार अधिकारी उपस्थित होते.सदर बैठकीत प्रामुख्याने तारांगण प्रकल्प पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांना चालविणेस देणेचा निर्णय झाला आहे."<br><br>पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या संचालक मंडळावर मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे अध्यक्ष आहेत. तसेच इतर विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ हे संचालक आहेत.त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या सदरचा तारांगण प्रकल्प हा पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांना चालविणेस देणे तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे.<br><br>सबब सदरचा तारांगण प्रकल्प पुढील चालन, देखभाल दुरुस्ती, तिकिटाचे योग्य व वाजवी दर ठरविणे, परिसरात इतर सुविधा जसे मिटींग हॉल, प्रदर्शन हॉल, कॅन्टीन परिसर इत्यादी तसेच इतर परिसरातील सुविधा त्यांचे मर्जीनुसार वापरास देणेसाठी पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांचेशी करारनामा करणे आवश्यक आहे.<br><br>करारनामा अटी-शर्ती ठरविणेसाठी मा.अतिरिक्त आयुक्त १, मा.मुख्य लेखा परीक्षक, मा.कायदा सल्लागार, मा.सह शहर अभियंता(वि), मा.सहाय्यक आयुक्त, भुमि आणि जिंदगी विभाग यांची समिती स्थापन करणे आवश्यक आहे. समिती स्थापनेस मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदर समितीचे शिफारशीनुसार अंतिम निर्णय घेणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे आवश्यक आहे.<br><br>सबब मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना तारांगण प्रकल्प पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांना पुढील २९ वर्षासाठी चालन देखभाल दुरुस्तीसाठी देणेकरीता करारनामा करणे, त्याचे अटी शर्ती ठरविणेबाबतचे अधिकार प्रदान करणेकामी मा.स्थायी समिती सभेची ठराव क्र.११४९ दि. १०/ ०१/२०२३ नुसार मान्यता मिळालेली असल्याने सदर विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| निर्णय | महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली. |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२८१** **विषय क्रमांक – २८१**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८१**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.आयुक्त यांचे कडील पत्र क्रं. साप्रपि/७/कावि/४७/२०२३ दि.०६/०२/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आकृतीबंध २०२३ बाबत. |
| **ठराव क्र. २८१**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.आयुक्त यांचे कडील पत्र क्रं. साप्रपि/७/कावि/४७/२०२३ दि.०६/०२/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका रिक्त पदे व भरती प्रक्रियेबाबत शासन स्तरावर यापुर्वी आढावा बैठक घेणेत आली असून महानगरपालिकेच्या आकृतीबंधानुसार सरळसेवेच्या रिक्त पदांचे भरतीबाबत कार्यवाही प्रस्तावित करणेकामी शासन स्तरावरुन निर्देश देणेत आलेले आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश “ब” वर्गात झालेने त्याप्रमाणे आकृतीबंध २०२३ नमुन्यामध्ये तयार करुन सादर करण्याच्या सुचना मा. शासनाकडुन दिलेल्या आहे.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व विभागांची यापुर्वी बैठक घेणेत येवून विभागनिहाय आकृतीबंधा मधील योग्य त्या दुरुस्त्या व आवश्यक मागणी अभिप्रायासह रिक्त पदांची व भविष्यातील आवश्यक पदांची माहिती मागविणेत आलेली होती.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील वाढती लोकसंख्या,नागरीकरणाचा झपाट्याने होणारा विकास, विविध विकास योजना व त्यानुसार शहराचे होत असलेले विस्तारीकरण या सर्व बाबींचा विचार करुन प्रत्येक विभागाच्या मागणीचा आकृतीबंध– २०२३ मध्ये समावेश करुन पदांच्या संवर्गाचा समावेश करणेत आलेला आहे. त्यानुसार आकृतीबंध २०२३ मध्ये प्रस्तावित एकुण पदसंख्या १६८३८ अशी प्रत्येक विभागाची पदनिहाय मंजुर पदांची माहिती व प्रस्तावित आकृतीबंध २०२३ मध्ये सादर करणेत आलेली आहे. त्यास्तव पत्र क्रमांक-साप्रवि/०७/कावि/३८/२०२३दि. २५/०१/२०२३ अन्वये आकृतीबंध २०२३ प्रस्ताव शासन मान्यतेकामी सादर करणेत आलेला आहे.<br><br>तरी “पिंपरी चिंचवड महानगरपालिका २०२३ मधील परिशिष्ट अ व ब नुसार विभागनिहाय प्रस्तावित आकृतीबंध - २०२३ यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-२८२** **विषय क्रमांक – २८२**

**दिनांक- ८/०३/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-२८२**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सविवि/०७/कावि/१४/२०२३ दि.०६/०२/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १२२४ दि.०७/०२/२०२३ अन्वये, "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" या योजनेअंतर्गत वस्तीपातळीवर प्रशिक्षण योजना राबविणेकामी मान्यता देणे बाबत |
| **ठराव क्र. २८२**<br>**दिनांक-८/०३/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.सविवि/०७/कावि/१४/२०२३ दि.०६/०२/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील युवती व महिलांनावस्ती पातळीवर नामांकीत संस्थांमार्फत विविध प्रकारच्या कोर्सेसचे कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबतच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत या क्षेत्रात कामकरणा-या संस्थांकडून रिक्वेस्ट फॉर प्रपोजल (RFP) मागविणेकामीचे जाहीर प्रकटन महाटेंडर या संकेतस्थळावर नामांकित संस्थांना त्यांचे प्रस्ताव दि.०१/१२/२०२२ ते दि. २१/१२/२०२२ या कालावधीत सादर करणेबाबत निविदा क्र. SVV/4/2022-23 दि. ०१/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. वरीलप्रमाणे निविदा क्र.SVV/4/2022 साठी ४ संस्थेच्या प्राप्त झालेल्या निविदापैकी मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. या संस्थेची निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र असल्याने प्रस्तृत काम मानांकनाप्रमाणे पुर्ण करणेस सक्षम असल्याने मान्यता देण्यात यावी. सदर प्रसिध्द करण्यात आलेली निविदा ही कामकाज आदेश देणेचे तारखेपासुन १ वर्ष कालावधीतील "पंडीत दिनदयाल उपाध्याय - महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" या योजनेच्या प्रशिक्षण देणेच्या कामासाठीची आहे. सदर प्रशिक्षणाच्या कामासाठी मे.सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि.यांची एकूण ३० प्रकारच्या विषयांचे वस्तीपातळीवर प्रशिक्षण देणेकामी नेमणुक करणेस व सदरचे प्रशिक्षण देणेस पुढीलप्रमाणे मान्यता देणेत यावी. एकुण ३० प्रकारच्या प्रशिक्षण विषयांची नावे ही निविदा क्र.SVV/4/2022 च्या Appendix VII मध्ये नमुद आहेत. या प्रशिक्षण विषयांचे प्रति लाभार्थी दर (प्रशिक्षण शुल्क) ही या निविदाच्या Appendix VI नमुद आहेत.<br><br>**निविदेमधीलAppendix VII व Appendix VI मध्ये नमुद केलेनुसार प्रशिक्षण विषयांचा तपशिल खालीलप्रमाणे प्रपत्र-अ** |

| अ.क्र | विषयाचे नाव | प्रशिक्षण कार्यक्रम कालावधी (तास) | Cost Category | प्रति तास प्रति लाभार्थी प्रशिक्षण शुल्क र.रु. | प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क र.रु. | प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्कावर १८% प्रमाणे होणारी जीएसटीची र.रु. | एकुण प्रशिक्षण शुल्क (प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीच्या रक्कमेसह होणारी रक्कम) र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | असिस्टंट फॅशन डिझायनर | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| २ | फॅब्रिक कटर - पोशाख, मेड अप आणि होम फर्निशिंग | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| ३ | फॅशन डिझायनर | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| ४ | स्वयंरोजगार टेलर | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| ५ | शिलाई मशिन ऑपरेटर | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | असिस्टंट ब्युटी थेरीपिस्ट | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| ७ | असिस्टंट हेअर स्टायलिस्ट | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| ८ | न्हावी | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| ९ | मेकअप ट्रेनर | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| १० | मेहंदी स्पेशालिस्ट | २०५ | २ | ४२ | ८६१० | १५५० | १०१६० |
| ११ | मॅनिक्युअरीस्ट अॅण्ड पेडीक्युअरीस्ट | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| १२ | खाते कार्यकारी( अकाउंट्स पेएबल अॅण्ड रिसिव्हेबल) | १५० | ३ | ३५ | ५२५० | ९४५ | ६१९५ |
| १३ | बालसंगोपण | २०० | २ | ४२ | ८४०० | १५१२ | ९९१२ |
| १४ | वृद्धसंगोपक(नॉन क्लिनिकल) | २०० | २ | ४२ | ८४०० | १५१२ | ९९१२ |
| १५ | घरगुती कामगार | २०० | २ | ४२ | ८४०० | १५१२ | ९९१२ |
| १६ | घरकाम व स्वयंपाकी | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| १७ | अन्न उत्पादन पॅकेजिंग तंत्रज्ञ | २४० | १ | ४९ | ११७६० | २११७ | १३८७७ |
| १८ | बहु पाककृती कुक | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| १९ | हस्तनिर्मित सोने आणि रत्न सेट ज्वेलरी- फायनल क्युसी आणि निरिक्षक | २०० | १ | ४९ | ९८०० | १७६४ | ११५६४ |
| २० | घनकचरा संग्रहक आणि विलगक | १६० | १ | ४९ | ७८४० | १४११ | ९२५१ |
| २१ | बांबुपासुन कलाकृती बनवणारा | १२० | २ | ४२ | ५०४० | ९०७ | ५९४७ |
| २२ | जुट शिलाई उत्पादन ऑपरेटर | २५० | १ | ४९ | १२२५० | २२०५ | १४४५५ |
| २३ | कुरियर वितरण कार्यकारी | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| २४ | कार्यालयिन सचिव | १८० | ३ | ३५ | ६३०० | ११३४ | ७४३४ |
| २५ | फिटनेस ट्रेनर | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| २६ | सहाय्यक केटरिंग मॅनेजर | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| २७ | काउंटर विक्री कार्यकारी | २४० | २ | ४२ | १००८० | १८१४ | ११८९४ |
| २८ | स्टोअर किपर सुविधा | २५० | २ | ४२ | १०५०० | १८९० | १२३९० |
| २९ | टुर गाईड | २५० | ३ | ३५ | ८७५० | १५७५ | १०३२५ |
| ३० | बैठक, परिषद आणि कार्यक्रम नियोजक | २५० | ३ | ३५ | ८७५० | १५७५ | १०३२५ |

उपरोक्त तपशिलामध्ये नमुद केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम कालावधीमध्ये NSQF मार्गदर्शक तत्त्वांनुसारच्या अभ्यासक्रम विकसित करुन त्या अभ्यासक्रमानुसार संस्थेने प्रशिक्षण राबवावयाचे आहे. यानुसार प्रति लाभार्थी झालेल्या प्रशिक्षणाचे शुल्क व त्यावरील अठरा टक्के जीएसटीसह संस्थेस अदा करणेस मान्यता देण्यात यावी. तसेच प्रशिक्षणातील इच्छुक महिला गटांच्या मागणीनुसार दररोज २ तासांऐवजी त्यांचे मागणीनुसारच्या तासिकेत अथवा NSDC च्या नियमाप्रमाणे लाभार्थी दररोज किती तास प्रशिक्षण घेऊ शकतात त्यानुसारत्यांना प्रशिक्षण देणेस मान्यता देण्यात यावी. “पंडीत दिनदयाल उपाध्याय– महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम” या योजनेअंतर्गतचे प्रशिक्षण हे वस्तीपातळीवर महिलांच्या मागणीच्या ठिकाणी, वेळेत व कालावधीतहोत असते. त्यामुळे वस्तीपातळीवर प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करणे, प्रशिक्षण निहाय आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करणे, सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक/ प्रशिक्षीका यांची नेमणुक करणे, इतर आवश्यक मनुष्यबळ/ कर्मचारी यांची नेमणुक करणे, त्यांचे मानधन ठरविणे इत्यादी प्रशासकीय व तांत्रिक कामकाज करणेची जबाबदारी संस्थेची असणार आहे. महिला गटांच्या मागणीनुसारच्या कालावधीत व वेळेत शक्यतो त्यांचे मागणीच्या ठिकाणी सदर प्रशिक्षणाचे आयोजन करणेत यावे. सदर योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील महिला/ मुलींच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ व्हावी, व्यवसाय करुन त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, विविध व्यवसाय कलांमध्ये महिलांनी पारंगत होवून त्यांचे दैनंदिन जीवनात त्यांना ते उपयुक्त ठरावे. या महिला सक्षमीकरणाच्या/ सबलीकरणाच्या दृष्टीने/ हेतूने महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी विविध व्यवसाय पुरक प्रशिक्षणाचे आयोजन करणेत येत असते. प्रशिक्षणमिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची जबाबदारी ही सर्वस्वी प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची असते. तरी सुध्दा प्रशिक्षणाच्या शेवटी प्रत्येक गटातील प्रशिक्षणार्थींचे

| | |
|---|---|
| | त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यांकन (Third Party Assessment) होणे गरजेचे आहे. म्हणुन त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यांकन (Third Party Assessment) करुन घेऊन तसा अहवाल सादर करण्याची जबाबदारी संस्थेची असणार आहे व त्यासाठी निविदेत Appendix VI मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रति लाभार्थी र.रु.३००/- संस्थेस अदा करण्यात यावी. तथापि, महिलांच्या कल्याणकारी हेतुने त्यांना विविध व्यवसायपुरक विषयांचे ज्ञान देणे हे मनपाचे कर्तव्य आहे. शासकीय/ निमशासकीय, सरकारमान्य, खाजगी इत्यादी तसेच पिंचिंमनपा अंतर्गत व समाज विकास विभागातील महिला व बालकल्याण योजनेच्या यापुर्वीच्या महिलांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण देणे या योजनेअंतर्गत/ महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत ज्या महिला/ मुलींनी यापुर्वी विविध प्रशिक्षण घेतलेले आहे त्यांना देखील या योजनेचा कामकाज आदेश दिलेचे तारखेपासुन १ वर्ष अखेरपर्यंतच्या कालावधीत प्रशिक्षणत्यांच्या मागणीनुसार एका आर्थिक वर्षात एका विषयांचे प्रशिक्षण देणेस मान्यता असावी. सदरचे प्रशिक्षण घेणेस महिलांना प्रोत्साहन मिळावे व प्रशिक्षण घेण्यासाठी आर्थिक कारण त्यांना बाधक होऊ नये यासाठी व कुठलीही इच्छुक महिला प्रशिक्षणापासून वंचित राहु नये या कल्याणकारी उद्देशास पुरक व सुसंगत धोरण असावे या उद्देशाने सदर योजनेअंतर्गतच्या प्रशिक्षणास इच्छुक महिलांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. म्हणजेच महिलांना मोफत प्रशिक्षणास धोरण म्हणुन मान्यता असावी. महिलांच्या ज्ञान कौशल्यात वाढ व्हावी या उद्देशाने सदर योजनेचे आयोजन करणेत येते. तसेच विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान/ कुवत /क्षमता असलेल्या गरजु महिलाच प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी फाईल सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. विशिष्ट शैक्षणिक अर्हते अभावी महिलांना त्यांचे इच्छेनुरुप ज्ञान कौशल्य कार्यक्रमात सहभागी होणेपासून वंचित ठेवले अथवा ते वंचित राहिले असे होणार नाही, केवळ शैक्षणिक अर्हतेतून ज्ञानाची पातळी कळून येत नाही. त्यामुळे कुठलीही गरजु/ इच्छुक महिला ज्ञान कौशल्य कार्यक्रमापासून वंचित राहू नये, कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतूने कुठलीही/ विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता सर्व इच्छुक साक्षर महिलांना ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमात सहभागी होण्यास मान्यतेकामी प्रस्तावित करणेत येत आहे. प्रशिक्षणातील विलंब टाळण्याच्या दृष्टीने तसेच प्रशिक्षणाच्या विलंबाबाबतच्या कुठल्याही तक्रारीस वाव राहु नये या हेतूने निविदामधील APPENDIX – IIउल्लेख केल्याप्रमाणे मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांना वस्तीपातळीवरुन इच्छुक महिला गटांच्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्तीनुसारच्या कागदपत्रांच्या फाईल्स स्विकारणेस मान्यता असावी. तसेच वस्तीपातळीवरुन ज्यांची ज्यांची मागणी असेल त्या सर्व महिलांच्या प्रशिक्षणाच्या गटनिहाय फाईल्स स्विकारणेत याव्यात व मागील एप्रिल २०२२ पासून शहरात कुठलेही प्रशिक्षण राबविले गेले नसल्यामुळे प्रशिक्षणासाठी जास्त महिलांची मागणी येण्याची शक्यता आहे. निविदेत यावर्षी किती लाभार्थी प्रशिक्षीत होऊ शकतील याची संख्या निश्चिती झाली आहे. लाभार्थ्यांची प्रशिक्षणासाठी मागणी जास्त आल्यास, त्या सर्व लाभार्थ्यांना याच दराने प्रशिक्षण देण्यास संस्थेवर बंधनकारक असेल. त्यासाठी संस्थेला कोणत्याही प्रकारे वेगळा दर वाढवुन देता येणार नाही. वस्तीपातळीवर महिलांना प्रशिक्षणात एकत्रितपणे प्रशिक्षण घेता यावे म्हणुन किमान २५ व जास्तीत जास्त ३० महिला या मर्यादित संख्येत प्रत्येक महिला गटांच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणेत यावेत. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल / दुरुस्ती करण्याचे / योजना अंमलबजावणी संबंधीत निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करुन योजना राबविण्यासंबंधीचे करारनामा करणे, तसेच वेळोवेळी प्रशिक्षण आदेश देणेचे व सदरील प्रशिक्षण संपल्यानंतर देयके अदा करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा.उप आयुक्त सो. (समाज विकास विभाग) यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणारा प्रत्यक्ष खर्च हा “पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम” या उपलेखाशिर्षावर चालु अथवा पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या / होणा-या तरतुदीमधुन करणेस मान्यता देणेत यावी. संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम ही लेखापरिक्षण पुर्ततेकामी म्हणून संस्थेला अदा करण्यात येणा-या देयकातुन राखुन ठेवण्यात यावी. म्हणजेच प्रशिक्षण संपल्यानंतर बिलापोटी संस्थेस ९५% रक्कम व त्यावरील अठरा टक्के जीएसटी एवढीच रक्कम अदा |

| | |
|---|---|
| | करण्यात यावी. तसेच कामकाज आदेश दिलेचे तारखेपासुन १ वर्ष अखेरपर्यंतच्या कालावधीचे प्रशिक्षण देण्याचे काम संस्थेमार्फत पुर्ण झालेनंतर सदर कामाचे मनपातील लेखापरिक्षणानंतर, लेखापरिक्षणातील सर्व आक्षोपाधिन आक्षेप व वसुलपात्र आक्षेप याची १००% पुर्तता झालेनंतर राखुन ठेवलेली सदरची ५% रक्कम संस्थेस परत देणेत यावी. तसेच कामकाज आदेश दिलेचे तारखेपासुन १ वर्ष अखेरपर्यंतच्या कालावधीत झालेल्या प्रशिक्षणाची देयके ही सन २०२२-२३ अथवा सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या सदर योजनेसाठी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन म्हणजेच महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर उपलब्ध असणा-या / होणा-या तरतुदीतुन अदा करणेस मान्यता असावी. तसेच या योजनेसाठी कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासुन १ वर्ष पर्यंतचा असल्याने सन २०२३-२०२४ या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. त्यात “पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम” या उपलेखाशिर्षावर असलेली तरतुद खर्च करण्यात यावी. सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात “पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम” या उपलेखाशिर्षासह इतर अन्य उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी “पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम” या उपलेखाशिर्षावर अन्य उपलेखाशिर्षांवरुन व समाज विकास विभागाकडील इतर (महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत केलेल्या तरतुदीं व्यतिरीक्त समाज विकास विभागासाठी केलेल्या इतर कल्याणकारी योजनेतील अन्य उपलेखाशिर्षातील तरतुदी मधुन) उपलब्ध तरतुदींमधुन आवश्यकतेनुसार “महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम” या उपलेखाशिर्षावर रक्कमा वर्ग करणेस मान्यता असावी व त्यानुसार “पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम” योजना ही मे. सॉफ्टझील टेक्नॉलॉजी प्रा. लि. यांचेमार्फत कामकाज आदेश दिलेचे तारखेपासुन १ वर्ष अखेरपर्यंतच्या कालावधीसाठी प्रपत्र - अ प्रमाणे प्रशिक्षण राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणी कामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे. दि.१८/०१/२०२३ रोजी चिंचवड विधानसभेची आचारसंहिता लागू झाली आहे. म्हणुन चिंचवड विधानसभा मतदार संघ हद्दीतील भाग वगळता भोसरी व पिंपरी विधानसभा मतदार संघातील हद्दीत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमाअंतर्गत विविध विषयांचे प्रशिक्षण देणेस व चिंचवड विधानसभेची आचारसंहिता शिथिल झालेनंतर चिंचवड विधानसभा मतदार संघातील महिलांनाही सदर प्रशिक्षण देणे संस्थेवर बंधनकारक राहील. सदरील योजनेसाठी RFP / निविदेत असलेल्या Appendix II मध्ये प्रशिक्षणाचे काम कसे करावयाचे हे नमुद आहे. त्यानुसार काम करण्याची कार्यपध्दती करारनाम्यात नमुद करण्यात येतील. त्याकामी सदर प्रस्तावास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**सही/-**
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**